OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "*Sustainable Development Goals*"

# आंबेडकरी शाहिरी एक आकलन

**प्रा. डॉ. मनोहर सिरसाट**
*सहयोगी प्राध्यापक आणि विभाग प्रमुख,*
*पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग आणि संशोधन केंद्र, बलभीम महाविद्यालय, बीड.*
*Email: manoharsirsat320@gmail.com*

*संक्षिप्त गोषवारा (Abstract) :*

प्रस्थापित मराठी शाहिरी आणि दलित शाहिरी यांच्या वाङ्मयीन प्रवाहाच्या मूल्यमापनात फार मोठी दरी आढळून येते. हा लोकसाहित्याचा वाङ्मयीन प्रवाह परंपरागत लोककलेचे संवर्धन करतो. लोकसाहित्याच्या लोककला, लोकनृत्य, लोकगीत, लोककथांच्या आधारे माणसाच्या सुधारणेत अनपेक्षित बदल घडवून आणणे, नवे मूल्य, नवे आयाम, प्रतिष्ठ, नैतिकता याची पुनर्रचना करून सुसंस्कृतपणे जगणे; हा उद्देश दलित शाहिरीत दिसतो. सामाजिक जडणघडणेबरोबर सांस्कृतिक बदल घडून आलेला दिसून येतो.

**Keywords: आंबेडकरी शाहिरी**

**प्रस्तावना :**

आदिम कला, लोककला रूढी परंपरेनुसार चालत आलेले दिसून येते. ही लोककला मानवाच्या जीवनाचे चक्र फिरवीत असे. आदिवासी, महार, मांग यांनी सादर केलेल्या लोककलेतून मानवी जीवनात क्रांती झाली; तरी दलित शाहिरी अजूनही उपेक्षित लोककला राहिली आहे असे दिसून येते. त्यामुळे दलित शहिरी आणि दलित शाहिरांना योग्य ते मान-सन्मान मूल्य मिळालेले दिसून येत नाही. आपल्या संपूर्ण लेखणीने लोकमन जागृत करणारे सर्व शाहीर लोककलेच्या क्षेत्रात उत्तुंग शिखर गाठू शकले असले तरी लौकिक जीवनात आर्थिकदृष्ट्या कधीही समृद्ध होऊ शकले नाहीत असे दिसून येते.

दोनशे वर्षापुर्वी मराठीत आविष्कारलेल्या दलित शाहिरीने आपल्या कला-कौशल्याने सामाजिक, सांस्कृतिक बदल घडविला. विचार, भावना, लढा, मुक्ती, इत्यादी नैतिक मूल्यांच्या स्थित्यंतराने माणसाला सुसंस्कृतपणे जगता यावे यासाठी जीवनवादी वाङ्मय, दलित शाहिरांचा प्रवास प्रबोधनात्मक ठरला असे दिसते. शाहिरीरचना, कवने, लावणी, पोवाडा, तमाशा, गोंधळ, वादन, नृत्य, वगनाट्य इत्यादी लोककलांच्या कलावंतांनी गाण्यातून बौद्धिक सृजनशीलतेची परिभाषा मांडली आणि त्यातील सत्य पटवून दिले. त्यामुळे मराठी शाहिरीत दलित शाहिरीमुळे नवे आशय, नवे आयाम, नवे संदर्भ, यांनी लोकजीवनात चिकित्सा निर्माण केली. म्हणूनच दलित शाहिरी वाङ्मयात दलित शाहिरांचे परिणाम स्थान महत्त्वाचे आहे.

सम्राट अशोकानंतर अनेक राजांनी राजवाडे, किल्ले बांधले, त्यात विविध कार्यानुसार अनेक प्रकारची दालने असत. त्यात दिवान-ए-आम व दिवान-ए-खास तसेच दिवान-ए-महफिल हेही दालन असायचे. त्या दालनास दर्शनी दालन म्हणायचे. या विशाल दालनात संगीत सभा व जलसे सादर व्हायचे. त्या काळात जत्रा, उत्सव, सण साजरे होत. त्या अनुषंगाने विविध करमणुकीचे कार्यक्रम होत असत. त्यात तमाशा, शाहिरी, नृत्य, संगीत, जलसे सादर केले जात. अशा प्रकारे या कलाप्रकाराला शिवकालीन कालखंडात थोडी मान्यता मिळाली होती आणि पेशव्यांच्या काळात त्या कलेचा थोडा उत्कर्ष झाला असे दिसते. पुढे यातून तमाशा, खेळ, डफगाणे, कलगीतुरा याद्वारे महाराष्ट्रात शाहिरी तमाशाला प्रारंभ झाला असे म्हणता येईल.

शाहिरी वाङ्मयाच्या या उत्कर्षाच्या काळात म्हणजेच पेशवाईत शाहिर अनंत फंदी, होनाजी बाळा, राम जोशी, प्रभाकर, सगनभाऊ, पठ्ठेबापुराव, कुलकर्णी यांनी पोवाडे लावण्या रचून शाहिरी कलेला राजमान्यता मिळवून दिली. हे सारे शाहीर तथाकथित उच्चवर्णीय होते. परंतु त्यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात सामाजिक बांधिलकी जोपासली असे दिसून येत नाही. पेशवाई काळापासून अखंड चालत आलेल्या या शाहिरीत तथाकथित उच्चवर्णीय होते. परंतु त्यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात सामाजिक बांधिलकी जोपासली असे दिसून येत नाही. पेशवाई काळापासून अखंड चालत आलेल्या या शाहिरीत तथाकथित उच्चवर्णीयांची मक्तेदारी राहिली असे दिसते. त्यामुळे दलित शाहिरी दुर्लक्षित राहिली असे दिसते. म्हणून दलित शाहिरीची निर्मिती, उगम, विकास, त्याचे मूल्य, दलित शाहीर व त्यांचे काव्य तपासले पाहिजे.

**दलित शाहिरीची निर्मिती**

महाराष्ट्राला संत - महात्म्यांच्या प्राचीन परंपरेबरोबर सांस्कृतिक लोककलेचाही वारसा आहे, हे विसरता येत नाही. मराठी वाङ्मयात शाहिरीचा आविष्कार झाला तेव्हा शाहिरी आणि शायर या शब्दाच्या उत्पत्तीबद्दल शाहिरी वाङ्मयाच्या अभ्यासकांनी 'शायर' अथवा 'षाईर' या शब्दाचे समर्थन केले. मात्र देशातील समाजव्यवस्थेने तमाशा, लोककला व शाहिरीला वाव तर दिला नाहीच उलट अपमानित केले. जाती-धर्माच्या संस्था प्रबळ झाल्या. त्याचीं जाती कार्यानुसार वर्गवारी केली. त्यामुळे मराठी शाहिरी एका विशिष्ट सीमेपलीकडे गेली नाही. तिचे वाङ्मयीन कार्यही तेवढ्यापुरते मर्यादित राहिले. शाहिरी तमाशा या काव्यप्रकारची मुळे जशी समाजातील सर्व स्तरावर खोलवर रूजली तशी ती दलित समाजातही रूजली. या शाहिरांनी उत्तमोत्तम कवने केली. त्यांच्या काव्यातील विद्रोह, वेदना, जिव्हाळा, तळमळ, मानवी मूल्याची जोपासना करणारे विचार यामुळे दलित शाहिरी प्रस्थापितांच्या कवनांच्या तुलनेत कुठेही कमी पडलेली नाही असे दिसते. या दलित शाहिरीत शृंगारिक, विररसपूर्वक उत्तमोत्तम रचना आहेत. याचे उत्तम उदाहरण आद्य वगनाट्यकार शाहीर उमाबाबू मांग यांचे देता येईल.

शाहीर उमाबाबू मांग हे मराठी शाहिरीतील पहिले वगनाट्यकार आहेत. त्यानी आपल्या वाङ्मयातून तमाशाच्या फडातून उपेक्षित समाजातील व्यथा, वेदना, मांडल्या. लावणी - पोवाडे आणि वगनाट्याच्या असंख्य रचना करून प्रस्थापित मराठी वाङ्मयाला वेगळी कलाटणी दिली. मराठी प्रस्थापित शाहिरीला प्रत्युत्तर देऊन दलित शाहिरीला नवे बळ दिले. बहिष्कृत समाजाची प्रतिभा कमी नव्हती हे उमाबाबूंच्या रचनांनी दाखवून दिले.

शाहीर शिवसंभा कवलापूरकर यांनी आपल्या शाहिरी रचनातून त्यात भर टाकली. शाहीर शिवसंभा कवलापूरकर हे छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील शाहीर होते. त्यांनी आपल्या तमाशा, लावणी, गवळण, छक्कड, याद्वारे दलित शाहिरीला नवे काव्य दिले. त्यांच्या तमाशाचे वैशिष्ट हे की त्यात ढोलकी, तुणतुणे, हलगी, सोबतच भंगारी व गेनवा यादोन देवदासी त्यांच्यासोबत काम करीत होत्या. तसेच गवळणीतून शिवसंभाने पारंपरिक दलित शाहिरी रचना लिहून मराठी शाहिरी वाङ्मयात मोलाची कामगिरी केली. तसेच पेशवेकालीन कालखंडानंतर २० व्या शतकाच्या पहिल्या-दुसऱ्या दशकात शाहीर हिरभाऊ वडगावकर यांनी 'गाढवाचे लग्न' अर्थात 'इंद्राचा दरबार' हा वग सादर केला. व भाऊ बापू नारायणगावकर यांनी 'छक्कड लावणी' सादर केली व रसिकांच्या मनाला वेड लावणारे 'चंद्रमोहन' हे वग १९६१ साली सादर केले. या वगाच्या सादरीकरणासाठी त्यांना राष्ट्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यामध्ये त्यांनी पारंपरिक शाहिरीला अथवा तमाशा फडाला तडा दिला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे अधिष्ठान प्राप्त केले. आणि गण, गौळण, बतावणी, वग यातून दलित चळवळीला प्रेरणा दिली. गण रचला आणि तथाकथित ब्राह्मणशाही व्यवस्थेवर सडतोड टीका करून मानवी मूल्यांची जोपासना केली असे दिसते. तसेच अस्पृश्यांना जागे करण्यासाठी भाऊ फक्कड यांनी जनजागृती आणि प्रबोधनपर कार्यक्रम केले. त्यांच्या कवनात उपरोधकता दिसून येते. अशा प्रकारे उमाबाबू, शिवसंभा कवलापूरकर, हरिभाऊ वडगावकर, भाऊ बापू मांग नारायणगावकर आदि तत्कालीन शाहिरांनी प्रस्थापित मराठीशाहिरीला धक्का देऊन दलित शाहिरीची निर्मीती केली असे दिसते.[१०]

स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे प्रामुख्याने १९२० नंतर शाहिरी वाङ्मयावर आंबेडकरी विचाराचा प्रभाव होता. या कालखंडात दलित शाहिरी आंबेडकरी विचारांनी भरलेली, भारलेली दिसते. मानवी प्रतिष्ठेचा नवा विचार या कालखंडातील

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

दलित शाहिरांच्या रचनेत सादर होत असताना दिसते. कारण आंबेडकरांनी केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या चळवळीचा इतिहास या कालखंडातील शाहिरांच्या रचनांतून पाहावयास मिळतो. चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, बुद्ध धर्माचा स्वीकार या घटनांनी शाहिरी बहारास आली. अस्पृश्यता, अंधश्रद्धा, हिंदुधर्माचे धर्मावडंबर, अध्यात्मिक क्षेत्रातही अस्पृश्य संतांना दिली जात असलेली हीन वागणूक, अस्पृश्यांच्या छळाचा आढावा घेत असताना अस्पृश्यातील कर्तबगार व्यक्तींनी स्पृश्यांची केलेली इमाने इतबारे सेवा अशा विविध घटनांनी आंबेडकरांनी उभारलेला मानवतेचा लढा व त्यातून दलित शाहिरांनी त्यांच्या लढ्यात सामील होऊन आंबेडकरांना साथ दिलेली दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद व्यक्त होत असताना भारतातील सांस्कृतिक चळवळी अधिक प्रभावी होत असताना दिसतात. परंतु अशाही अवस्थेत दलित शाहीर आपल्या रचनातून आपल्या अस्तित्वाचा शोध घेत असताना दिसतात. या शाहिरांनी आंबेडकरांचे विचार, आचार आपल्या शाहिरीतून मांडलेले दिसते. अशा प्रकारे आंबेडकरी विचार,आचार यांचा प्रभाव दलित शाहिरांवर दिसून येतो. त्यामुळे दलित शाहिरीला आंबेडकर चळवळीपासून प्रेरणा मिळाल्याचे दिसते.

१९२० ते १९५६ या काळात दलित शाहिरीत नवविचार प्रवाहाचे नवचैतन्य संचारलेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या काळात शाहिरी चळवळीला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा महामंत्र दिला. सामाजिक परिवर्तनाबरोबर सांस्कृतिक परिवर्तनही घडविलेले दिसते. खऱ्या अर्थाने या कालखंडात दलित शाहिरीचा विकास झालेला दिसून येतो. या काळात दलित शाहिरांनी अन्याय, अत्याचार, गुलामी इत्यादीविरूद्ध जनजागृती केलेली दिसते. अशा काही शाहिरांमध्ये पतितपावनदास, भीमराव कर्डक, शाहीर हेगडे, केरूबुवा गायकवाड यांचा उल्लेख करणे महत्त्वाचे वाटते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

[१] डॉ. ठाकूर भगवान - आंबेडकरी जलसे - सुगावा प्रकाशन, पुणे प्र.आ. २००५.
[२] परांजपे अशोक - युवशक्ती सुवर्ण महोत्सव अंक १९८७.
[३] डॉ. नंदपुरे - दलित नाटक आणि रंगभूमी पिंपळापूरे ॲंड. कं. पब्लीशर्स, नागपूर.
[४] डॉ. सांगोलेकर अविनाश - दलित साहित्य : उगम आणि विकास, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
[५] गायकवाड महेंद्र - दलित शाहिरी, संकेत प्रकाशन, नागपूर.
[६] उमप विठ्ठल - पानात पिंपळाच्या, शुभम इंटरप्रायजेस महल, नागपूर.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 25 , Vol. 3<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# "महात्मा बसवेश्वरांच्या साहित्यातील सामाजिकता"

**प्रा.डॉ.मनोहर सिरसाट**
संशोधन मार्गदर्शक, मराठी
विभागप्रमुख बलभीम महाविद्यालय, जि.बीड

रेणुका शिवलिंगआप्पा संभाहरे
संशोधक विद्यार्थीनी

---

**प्रस्तावना :**

आपल्या भारत देशाला अनेक महान संत महात्मे यांची परंपरा लाभलेली आहे यात काही संतांनी खूप मोलाची भर घातली आहे जसे की, गौतम बुध्द, वर्धमान महावीर, संत कबीर, गुरुनानक देव, संत रवीदास आणि बसवेश्वर यांनी जगाला अस्पृश्यता, वर्णभेद, जातीभेद, लिंगभेद झुगारुन समता, बंधुता, विवेक आणि त्याचबरोबर कायक वे कैलास आपल्या प्रामाणिक श्रमातच परमेश्वर आहे असा महान संदेश बसवेश्वरांनी दिला. हा संदेश त्यांनी बाराव्या शतकात दिला आहे. आणि त्या काळात परिस्थिती खूप वाईट होती. इथे ईश्वराच्या नावाखाली मनुष्याची सर्व प्रकारची फसवणूक व छळ होत असे. सामाजिक, मानसिक, आर्थिक अशा प्रकारची फसवणूक केली जात होती. त्यांना उच्चनीचता मान्य नव्हती. त्याच बरोबर त्यांना व्रतवैकल्ये कर्मकांड हे मान्य नव्हते. विषमता हिच आपल्या सामाजिकतेचा पाया होता. हे बसवेश्वरांना माहित होते. त्यामुळे त्यांनी सामाजिक आणि धार्मिक विषमतेवर जोरदार हल्ला केला. ही विषमता भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांनी पहिली लोकशाही संसद निर्माण केली ती म्हणजे अनुभवमंटप यामध्ये सर्व जातीमधील लोकांना प्रवेश होता. कोठेही उच्चनीचता नव्हती. स्त्री-पुरुष, वर्ण, अस्पृश्यता, जाती कुठल्याही प्रकारचा भेदभाव अनुभवमंटपामध्ये नव्हता. सर्व जाती धर्मातील लोकांना प्रवेश होता. बसवेश्वरांना चातुर्वर्ण्य व्यवस्था मान्य नव्हती. तसेच त्याचबरोबर स्त्रियांना समान हक्क व अधिकार, स्त्री जीवनविषयक सुधारणा, स्त्रीयांची सुतकापासुन मुक्ती, त्याचबरोबर स्त्री शिक्षणासाठी पुढाकार, विधवा विवाह व सतीबंदी संबंधी विचार, विधवा पुर्नविवाह, आंतरजातीय विवाहासाठी पुढाकार अशी अनेक सामाजिक कार्य बसवेश्वरांनी केले आहे. असा सामाजिक सुधारणेचा संघर्ष महात्मा बसवेश्वरांनी केला.

**जात प्रथेस विरोध :**

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जातीला प्रमुख स्थान आहे. माणूस ज्या जातीत जन्माला आला तो त्या जातीचा होतो. जातीच्या आधारे त्याला श्रेष्ठ-कनिष्ठ किंवा उच-निच ठरविले जात होते. जात ही जन्मावर आधारलेली होती म्हणून प्रत्येक जातीची ठराविक कामे देखील जातीवरुन पाडण्यात आली होती. त्यावेळी माणसाच्या श्रमापेक्षा, कष्टापेक्षा, कामापेक्षा जातीला जास्त महत्व होते. त्यामुळे माणसांना मूल्य किंवा महत्व नव्हते. खालच्या जातीतील लोकांना हिन वागणूक दिली जात. आठशे- नऊशे वर्षापूर्वी म्हणजे बाराव्या शतकात ही परिस्थिती किती बेकार किंवा भयानक होती याचा अंदाज आपण आजही घेऊ शकतो. जर आज आपण एकविसाच्या शतकात जगत असलो तरी जातीचे स्वरुप टिकून आहे असे आपल्याला दिसून येते.

महात्मा बसवेश्वरांनी जाती प्रथेस प्रखरपणे विरोध केला हे त्यांच्या वचनांमधून दिसून येते. त्यांनी आपल्या वचनातून खालच्या जातीतील म्हणजे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीशी आपले नातेसंबंध प्रस्थापित केले आहे. यामध्ये ते त्यांची जात विसरले होते. या वचनामधुन समानतेची व समरसतेची भावना दिसून येते.

"हर ज्याचा आदी पुरुष आहे, पुरातन ज्याचा परिवार आहे
त्या घरात जन्मलेल्या मांगाचा मी पूत्र आहे.
माझ्या पित्याने जातीचे सुतक नष्ट केले आहे
मादराचा (मांगाचा) पूत्र मी आहे.
सर्पभूषण कूडलसंगमदेवा,
चन्न्या माझे आजोबांच्या आजोबांचे वडील आहेत."[१]

ह्या वचनातून असे दिसून येते ज्यांना खालच्या जातीचे समजले जात होते त्यांच्या मनातून नीचतेची भावना दूर करण्यासाठी त्यांनी त्यांच्याशी आपले नाते जोडले. हे नाते जोडतांना त्यांनी अनेक प्रकारच्या जातीतील लोकांविषयी आपला आदरभाव व अभिमान व्यक्त केला आहे असे दिसून येते. त्यांच्या नजरेत सर्वसमान आहे असे दिसून यते. बाराव्या शतकात जातीव्यवस्थेची मुळे खूप खोलवर गेलेली होती. त्यासाठी बसवेश्वरांना खूप संघर्ष करावा लागला. बसवेश्वर आपल्या पुढील वचनामध्ये ऋषीमुनींच्या जातीचा प्रमाण देतात व सांगतात की, जातीच्या उच्चनीचतेवर चांगला-वाईट, गुणावगुण अवलंबून नसतो.

"व्यास भोईणीचा पुत्र, मार्कंडेय मांतगीचा पुत्र ;
कूलगोत्रांच्या अगोदर काय होते ?
साक्षात अगस्त्य बेरड, दुर्वास चांभार,
कश्यप लोहार, न्हावी कौंडिण्यासी
सारे त्रिभुवन जाणते पहा.
आमच्या कूडलसंगमदेवाचे वचनच असे आहे

श्वपच असला तरी शिवभक्तच कुलीन आहे"[२]

**विषमतेला विरोध आणि समतेची प्रस्थापना :**

महात्मा बसवेश्वरांनी समाजातील असलेल्या विषमतेला अत्यंत जोरदारपणे विरोध केला आणि त्याचबरोबर समता प्रस्थापित करण्यासाठी अनेक प्रकारची पावले उचलली. त्यांना हे समजले होते की, हा लढा जिंकायचा असेल तर यात समाजातील सर्व स्तरांतील लोकांना सहभागी करावे लागेल जर हे तयार होत नसतील तर त्यांच्या विरोधाला न बघता त्यांच्याशी संघर्ष करावा लागेल व त्यात कोणत्याही प्रकारची कसर ठेवली जाणार नाही असे धोरण त्यांनी स्वीकारले. त्यांनी त्यांच्या पदाचा किंवा सत्तेचा गैरवापर केला नाही. तर त्यांनी सामान्य माणसांशी त्यांनी आपुलकीचे, ममतेचे नाते जोडले आणि त्यांच्या मनात विश्वास निर्माण केला हे त्यांना माहित होते. सामाजिक समतेचा आणि विषमतेला यशस्वी करायचे असेल तर सामाजातील सर्वजातीतील लोकांना एकत्र आणून त्यांच्यावर अन्याय होत आहे. तसेच जे अन्याय करीत आहेत त्यांचे प्रबोधन होणे आवश्यक आहे. असा चांगला दृष्टीकोण बसवेश्वरांचा होता. समतेचे तत्व मान्य करणे शक्यच नव्हते.

**स्त्रियांना मुक्तीचे पंख :**

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्री वेगवेगळ्या रुढी, परंपरा धार्मिक बंधनांनी प्राचीन काळापासुन बांधलेली आहे. त्यामुळे तिचे जीवन हे पशुसमान होते. स्त्री ही पुरुषांसाठी उपभोगाची वस्तु होती तिचा सेवेसाठी वापर केला जात होता. स्त्री जीवनावर होणारा अन्याय स्वतः बसवेश्वरांनी पाहिला होता आणि अभ्यासला होता. त्यामुळे त्यांना जीवनांमध्ये बदल होण्याची अत्यंत गरज आहे हे बसवेश्वरांना वाटले. बसवेश्वरांची दूर दृष्टि असल्यामुळे त्यांना समजले होते. भारतीय समाजाची प्रगती आणि स्त्री जीवनाचा विकास ह्या दोन गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत. स्त्री ही कुटूंबाची अविभाज्य घटक आहे. म्हणून ह्या घटकाला दुर्बल ठेवणे संपूर्ण समाजाला व देशाला दूर्बल ठेवण्यासारखे आहे असे बसवेश्वरांना वाटते. तसेच बसवेश्वरांनी शैक्षणिक स्थिती पाहिली तर स्त्रीचे शिक्षण हे एक टक्का देखील नसावे. कारण स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे कार्य धर्मव्यवस्थेने केले होते. "मनुस्मती म्हणते की, स्त्रियांना उपनयन व वेदपठणाचा अधिकार नसावा. कारण स्त्रीचा विवाह हेच तिचे उपनयन असते."३ ह्याचा अर्थ तिला परावलंबी बनवण्याचे काम धर्मव्यवस्थेने केले होते. पण बसवेश्वरांना ते मान्य नव्हते. याची जाणीव बाराव्या शतकात बसवेश्वरांना होती.

**बालविवाहास विरोध आणि पुनर्विवाहास मान्यता :**

बसवेश्वरांनी बाराव्या शतकात बालविवाहास विरोध व विधवा पुनर्विवाहास मान्यता दिली होती. त्यांचे असे मत होते की, वधु आणि वराने एकमेकांना पसंत केले पाहिजे असे म्हणणे होते. पुरुषांप्रमाणे जीवन जगण्याचा अधिकार स्त्रीयांना देखील आहे हे मत त्यांनी वास्तवात देखील आणले. अनुभवमंटप स्त्रीयांना पुरुषासमान स्थान दिले आहे. भारतीय संस्कृतीमध्ये अपघाताने अचानक वैधव आले तरी अशा स्त्रीयांना चांगल्या प्रकारची वागणूक दिली जात नव्हती. तिला कुठल्याही पुजाविधी, मंगलप्रसंगी तिची उपस्थिती अशुभ मानली जाई. त्यामध्ये वास्तविक पाहता तिचा काहीच दोष नसतो. परंतू भारतीय संस्कृतीने तिला दोषी ठरवून तिचा पूर्नविवाह नाकारला.

बाराव्या शतकापर्यंत हिंदू विधवांची अपवित्र, अशुभ म्हणून तिची हेटाळणी होत होती. तिचे केशवपन करुन तिचे अलंकार, चांगली वस्त्रे, चांगले भोजन ग्रहण न करण्यासारखी जी हजारो बंधने लादली होती, ती बंधने झुगारुन विधवांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार बसवेश्वरांनी दिला. "लिंगायत धर्मात विधवा मुक्तपणे विवाह समारंभात किंवा धार्मिक विधीमध्ये आत्मविश्वासाने सहभागी होऊ शकतात."[४] लिंगायत संस्कृतीमध्ये विधवांना अपवित्र किंवा अस्पृश्य मानलेले नाही. पतिच्या मरणानंतर सती जाणे, केशवपन या प्रकारांना अजिबात जागा नव्हती. पुरुष जर पत्नीच्या मरणानंतर पुर्नविवाह करु शकतात तर स्त्रीयांनी का सुरक्षित राहण्यापासुन दूर राहावे ? हे बसवेश्वरांचे म्हणणे होते. लिंगायत धर्मात ज्या वेश्या स्त्रीया आल्या आणि त्यांनी इष्टलिंग दीक्षा घेतली त्यांचे सन्मानपूर्वक पुनर्वसन करण्याचे दायित्व त्यांनी स्वीकारले होते. त्याचप्रमाणे मंदिरे व त्यातील पुजारी व पुरोहित ह्या गोष्टी झुगारुन त्यांनी देवदासी प्रथेला विरोध केला. यापलिकडे जाऊन वेश्या आणि देवदासी यांचे विवाह ही त्यांनी लावून दिले. त्यांना समाजामध्ये माणूस म्हणून जगण्याची एक नवीन दिशा दिली. स्त्री गुणगान करतांना त्यांच्या मनात एक वेगळ्याच प्रकारचा आदर व्यक्त होताना दिसतो ते एका वचनात ते म्हणतात.

"स्त्रीचे दिव्य रुप पहा पुरातन्यानों !
बालेचे मुग्ध रुप पहा पुरातन्यानों !
स्वतः मध्ये स्वतः निश्चळ वर्णनातील आहे
या कूडलसंगमदेवाचे व्यक्तित्व माझ्या महादेवी आक्कात आहे !"[५]

पुरुषाप्रमाणे आणि पुरुषाइतका आनंदी जीवन जगण्याचा अधिकार स्त्रीयांना सुध्दा आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. आपले हे म्हणणे त्यांनी वास्तवात किंवा कृतीत देखील आणण्यासाठी अनुभवमंटपामध्ये स्त्रीयांना पुरुषासमान स्थान दिले. पुरुषी अहंकाराला किंवा वर्चस्वाला हादरा देणारे बसवेश्वर पहिले महापुरुष होते.

➢ **निष्कर्ष :**

१. बसवेश्वरांनी स्त्रीयांना देखील पुरुषांइतका समान अधिकार दिला.
२. उच्च-नीचता, जात-पात धर्मकांड किंवा कर्मकांड झुगारुन लावण्याचा प्रयत्न केला.
३. स्त्री समाजातील व समाजजिवनातील अमूल्य असा घटक आहे हे सांगितले.
४. विधवा स्त्री व वेश्यांचे पूर्नविवाह यासाठी पुर्नप्रस्थापनासाठी प्रयत्न केले.

➢ **संदर्भ ग्रंथ :**

१. सुभाष कि.देशपांडे 'महात्मा बसवेश्वर आणि कार्य कर्तृत्व' जनशक्ती वाचक चळवळ, प्रथमावृत्ती २१ मार्च २०१५ पृ.क्र. ११९.
२. डॉ.अशोक गं. मेनकुदळे 'क्रांतिकारी युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर' महाराष्ट्र बसव परिषद, हिरमेठ संस्थान, भालकी पृ.क्र.१११.
३. डॉ.सचितानंद शं. बिचेवार, 'परिवर्तनाचा महामेरु महात्मा बसवेश्वर' स्वाती प्रकाशन पूर्णा, प्रथम आवृत्ती : एप्रिल २०१५ पृ.क्र.५३.
४. डॉ. अशोक गं. मेनकुदळे उनि पृ.क्र.११७.
५. सुभाष कि. देशपांडे उनि पृ.क्र. १३५.

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

March 2020 Special Issues- 25 Vol. 3

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Chief Editor
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

Editor
Dr. R. K. Kale

Co-Editors
Dr. S. N. Akulyar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 25, Vol. 3<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**March 2020 Special Issue- 25 Vol. 3**

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Chief Editor
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

Editor
Dr. R. K. Kale

Co-Editors
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

Shaurya Publication, Latur

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 25, Vol. 3 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# Index

1. भारतीय सामाजिक आंदोलनों में महिलाओं की भूमिका — 1
करपे अश्विनी सहदेवराव , प्रोफेसर ललिता राठोड

2. नारी सशक्तिकरण और भारतीय नारियाँ — 3
प्रा. डॉ. मरगीळ गजानन बाबुराव

3. आंबेडकरी गीतातील सामाजिकता — 6
प्रा. डॉ. मनोहर सिरसाट

4. चलन निश्चलनीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था — 9
डॉ.मारोती तेगमपुरे

5. छत्रपती संभाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन- एक चिकित्सक अभ्यास — 13
प्रा.मोहन काळकुटे

6. भारतीय सामाजिक चळवळीमध्ये स्त्रियांचे योगदान — 15
मोहीनी ज्ञानेश्वर सुर्यवंशी

7. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाय योजना — 18
डॉ. मोहिते बबन मुर्लीधर

8. आदर्श समाज निर्मितीसाठी तुकडोजी महाराज यांना अपेक्षीत महिला सक्षमीकरण — 22
शुभांगी विजयराज मोहोड

9. भारतातील दारिद्रयाचा अभ्यास — 24
डॉ. मुळे पी.एम.

10. कलम ३७० व ३५(A) चा भारतीय राजकारणावरील प्रभाव :- — 28
प्रा.मुंडे एस.एम.

11. धर्मनिरपेक्षता व राजकारण — 30
प्रा. डॉ. नागेश खु. गायकवाड

12. भारतीय सामाजिक चळवळीत महिलांचे योगदान — 34
नागनाथ दाजिबा साळुंके

13. संयुक्त कुटुंबाच्या विघटनाची कारणे आणि परिणाम — 37
प्रा. डॉ. नवनाथ शिंदे



158

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25 , Vol. 3 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# आंबेडकरी गीतातील सामाजिकता

**प्रा. डॉ. मनोहर सिरसाट**
संशोधन मार्गदर्शक तथा विभाग प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

---

**प्रस्तावना :**

वामनदादा कर्डक हे आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य व्यक्तिमत्त्व आहे. कवी, गायक आणि नामवंत शाहिर अशी त्यांची ओळख आजतागायत कायम राहिलेली आहे. विशेष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या जीवन कार्यावर प्रचंड निष्ठ असणारे व्यक्ती म्हणून वामनदादा कर्डक यांचा उल्लेख करावा लागेल. वामनदादा कर्डक यांच्या गीतातून, काव्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निष्ठेचा प्रत्यय प्रामुख्याने आढळतो. या त्यांच्या काव्याचे किंवा गीताचे विशेष म्हणजे पारंपारिक पद्धतीने चालत आलेल्या समाजातील मानसिकता बदलून टाकणे हे होय. त्यांच्या गीतातून आणि काव्यातून विशेषतः समाज प्रबोधन, सामाजिक परिवर्तन लोकजागृती घडविणे, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सर्वसामान्य जनमानसात पोहचविणे, लोकशाहीला पुरक आणि मानवी मूल्यांचे संवर्धन करणे व प्रसार व प्रचार करणे ही ध्येयसिद्धीची प्रतिज्ञा त्यांच्या काव्यगीताने घेतलेली आहे असे जाणवते. तत्कालीन काळामध्ये आंबेडकरी विचाराने प्रभावित अनेक शाहीर, जलसेकार काव्यगीतातून प्रबोधनपर काव्यरचना करीत होते. त्यामध्ये राजानंद गडपायले श्रीधर ओहळ, दीनबंधू शेगावकर, भीमराव निरभवणे, अमृतबुवा बावस्कर, दलितानंद नागोराव पाटणकर आदींचा त्यात समावेश होता.

वामनदादा कर्डक यांनी उत्तम रचनाकार गीतकार आणि शाहीर होण्यामागे प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनदृष्टीतून आणि विचारांतून घेतलेली आहे. मूळ म्हणजे माणसाला आपल्या अस्तित्त्वाची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी करून दिली आहे. वामनदादा आपल्या गीताबद्दल आणि रचना निर्मितीबद्दल म्हणतात की, "माझ्या आवाजाची जाणीव मी गाऊ लागलो तेंव्हा झाली आणि मी रचना करू लागलो, म्हणजे त्रेचाळीस साली. त्याच वेळी जाणवलं की मी गीत रचना करू शकतो. आणि माझ्या गीत रचनेला लोक समजू शकतात मान देतात"[१] वरील संदर्भावरून असे लक्षात येते की वामनदादांना अगोदर स्वतःची जाणीव झाली आणि लोकांच्या मनावर ते अधिराज्य गाजवू लागले. हे स्पष्टपणे त्यांनी आपले मत अभिव्यक्त केलेले आहे.

**गीतातील सामाजिक आशय :**

वामनदादा कर्डक यांनी अनेक प्रकारे गीत गायन, गीत लेखन केलेले आहे. या गीत लेखनातून आणि गायनातून त्यांनी सामाजिक आशय अभिव्यक्त करतांना देशांतर्गत भाषण, धर्मांचे ठेकेदार, प्रांत, सांप्रदायिकता, सीमावाद, सांस्कृतिक कट्टर धर्मांधता दहशतवाद, जमातवाद, मूलतत्त्ववाद, नक्षलवाद आतंकवाद राजकीय नेतृत्वानी स्वीकारलेली भगवी धर्मांधता, ब्राम्हण्यवाद आणि भांडवल आतंकवाद, ठेकेदारांचे पोषण संरक्षण, जातीय अत्याचार, जातीय संघर्ष, यासारख्या सामाजिक विषयाला हात घालून त्यांनी लेखन केलेले आहे. या लेखनाबरोबरच त्यांनी गायनाच्या माध्यमातून समाजजागृती करण्याचे कार्य केलेले दिसून येते. मानवी समाजामध्ये वामनदादांनी अस्वस्थ करणारे प्रश्न त्यांच्या लेखनाचे आणि गायनाचे उर्जास्थानच म्हणावे लागतील. जागतिकीकरण, खाजगीकरण उदारीकरण इ. च्या मुळे मानवी समाज कशा पद्धतीने उद्ध्वस्त होतो. आहे याचे वास्तव त्यांनी आपल्या रचनेतून मांडलेले आहे. मानवी समाजाचा विचार करता देशातील सर्वसामान्य माणूस स्वदेशातील व्यक्तीच्या प्रकोपामुळे अधिकच असुरक्षित झालेला आहे. हे त्यांच्या काव्यगीतातून आजतागत आढळते. या मानवाला स्थिर करण्यासाठी लोकशाही हाच एकमेव विकासाचा मार्ग आहे परंतु या लोकशाहीचे अस्तित्त्व आज धोक्यात आहे. यांची प्रचंड भीती त्यांना आहे. त्यासाठी जोपर्यंत देशात मानवी मूल्यांना स्थान निर्माण होणार नाही तोपर्यंत मानवी समाजात विषमता आपले अस्तित्त्व कायम राखेल यावर दूमत नाही. वामनदादा कर्डक यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आव्हान आपल्या गीत गायनातून केलेले आहे. दलितांमधील जागृती करताना ते आपल्या गीतामध्ये म्हणतात,

"भीमाचे नाव तुम्ही पुढे चालवा जाता
भले जगाचे करा भीम पथाने आता
अवघ्या मानवास दाखवा भला रस्ता
जीवा जगण्यात जिथे न कशाची कमतरता
मानव मानवास लावितो तिथे ममता
वाहतो आपुले पण एक दुजाची चिंता
द्वेष, वर्तनाचा जिथे न लागे पता
नांदे हर्षभरे अशी मानवी समता
त्याच बुद्धाच्या गावा होवूनी आता
सुख नगरात सुखी होवूनी या सारी जनता
ह्या दुनियेला दान हेच दिव्य ज्ञानाचे ।।५।।
आज देशात दुःख, दैन्य आणि अज्ञान
कुणाल कष्ठ करून नसे खावया अन्न
असंख्य जीव इथे जन्मभूमी भूमिहीन

तुडविला गेला इथे भूमिहीन
तुडविला गेला इथे माणसातला मान
कुणी गिळून जगे पदोपदी अपमान
कशाशी खावे नाही ठाणे कुणाला ज्ञान
कुणी पोटार्थ सदा हिंडती रानोरान
दशा देशाची अशी केली हिंदूधर्मान
जसाकुडीत धुडमळावा प्राण जाताना
मानवहित जीवन बदला असे दिनांचे ।।६।।"२

वरील काव्यपंक्तीतून वामनदादांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने जाण्याचा सल्ला दिलेला आहे. समाजामध्ये स्वातंत्र्य समता बंधुता व सामाजिक न्याय आणि ममता टिकवून ठेवायची असेल तर आंबेडकरी विचारांना जीवंत ठेवणे गरजेचे आहे. मानवी समाजात असणारा द्वेष, मत्सर नाहीसा करण्यासाठी आणि दिव्यज्ञान प्राप्त करून घ्यायचे असेल तर बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान आणि तत्त्वे समाजाने अंगीकारले पाहिजेत. भारतीय समाजमनात अज्ञान, दैन्य, दुःख नि दारिद्र्य यांनी थैमान घातलेले आहे. परकीय भांडवलदारांनी आपल्या देशातील मूळ मालकीच्या मालकांना हाकलून देवून त्यांच्या जमीनी खरेदी करून कित्येक पारंपारिक शेतकऱ्यांना भूमिहिन करण्याचे कार्य केले. त्याच बरोबर अस्पृश्यांना शिक्षणाचा हक्क मिळावा यासाठी आणि त्यांची जाणीव व्हावी यासाठी वामनदादांनी वरिल रचनेतून यथोचित प्रयत्न केलेला दिसतो.

वामनदादांनी काही राष्ट्रकाव्य गीतातून देशाची सार्वभौमत्व आणि स्वातंत्र्य अखंडित ठेवण्यासाठी त्याचबरोबर आपल्या राष्ट्रकाव्यातून सामाजिक एकात्मतेची आणि बंधुभावाची जाणीव व्यक्त करून दिलेली आहे. भारतीय समाज विविध भागामध्ये विभागलेला आहे. या विभागण्या पाठीमागचा संदर्भ शोधता देशात सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय बार्बीचा जवळून अभ्यास केल्याचे जाणवते. भारतीय समाज हा वंश,धर्म, वर्ग, वर्ण, जात, पंथ आणि भाषा यामध्ये आजही विभागला गेलेला पाहवयास मिळतो. या विभाजनामागे भारतात सातत्याने नांदणारी विषमता हे एक प्रमुख कारण मानावे लागते. त्याचबरोबर त्यांनी आर्थिक, सामाजिक, लोकशाही राष्ट्रात स्वातंत्र्य, समता बंधुता आणि सामाजिक न्याय पेरण्याच काम आपल्या काव्य पंक्तीतून केलेले आहे. यावर माधवराव गायकवाड म्हणतात की,

"जात माणसाला दावली म्हणूनी
किड भारताला लावली म्हणूनी
किड लावलेल्या काव्या मनुसम"३

वरील संदर्भातून भारतभूमी नांगरणी, विकास, कोंडमारा, भारतातील असणारी जाती व्यवस्था, त्याचबरोबर भारताचे विषमतेचे चित्रण इ. सामाजिक वास्तवाची जाणीव त्यांनी व्यक्त केलेली आहे. भारतासारख्या लोकशाही देशाला जाती-जातीत मनूने विभागलेले आहे. मनुने तयार केलेल्या मनुस्मृतीमध्ये बंधिस्त करण्याचे काम करून लोकांना जात त्यांच्या मेंदूत पक्की करून जाती-जातीमध्ये तुच्छतेची भावना निर्माण केली. यावर प्रहार करण्याचे काम वामनदादा कर्डकांनी केलेले आहे, ते वरील संदर्भावरून आढळून येते. सामाजिक जीवनामध्ये आर्थिक विषमतेचे पोषण करणारे मुळ देशातील धर्मसस्थेमध्ये दडलेले आहे. मानवी कल्याणासाठी आणि सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी त्याच बरोबर धर्मांची पुर्नरचना करण्यासाठी यापूर्वी कोणीही प्रयत्नशील नव्हते ज्यांनी कोणी याबद्दल आवाज उठवण्याचे धाडस केले त्यांना धर्मांधांनी सर्वाधिक छळले यावर गायकवाड माधवराव म्हणतात की,

"धर्माने ग्रासलेल्या जनतेपुढे
वैरानी ग्रासलेल्या जनतेपुढे
भारताच्या एकतेचे ताट वाढू
त्यातून आम्ही आमचे वाट काढू"

या गीतातून वामनदादांनी भारतीय समाज जीवनामध्ये ऐकोप्याची भावना मांडण्याचे काम केले आहे. धर्मामुळे या देशातील समाज जीवनात वैर कसे वाढते, त्याच बरोबर धार्मिक गुलामगिरी अत्याचार अन्याय इत्यादी वर मात करण्यासाठी उत्प्रेरक अशा गीताची रचना निर्मिती वामनदादांनी केलेली आहे. भारतातील असणारी जाती व्यवस्था समाजमनातून अद्याप ही बाजूला झालेली नाही. प्रत्येक जण आपल्या जातीय अभिमानाने इथे बाहेर काढून संघटित करून संघर्ष करण्यासाठी प्रयत्नशील कसे होता येईल यावर त्यांनी आपल्या काव्यगीतातून महत्वाचा सल्ला दिलेला आहे. पिढ्यान पिढ्या जखडत पडलेला समाज बाहेर काढून त्यात असणारी जातीयतेची जळमटे झटकुन संस्कृतीत जपत आलेल्या परंपरेवर घाव करत मानवी समाजाचे अस्तित्त्व प्रगल्भ करण्यासाठीचा हा वामनदादांचा प्रयत्न आहे.

वामनदादांनी अनेक काव्य प्रकाराबरोबरच गझल हा काव्य प्रकार हाताळलेला आहे. गजलेच्या माध्यमातून आशयपूर्वक समाजदर्शन घडवण्याचे काम वामनदादा कर्डक यांनी केलेलेआहे. जनसामान्यांच्या भावभावनेला आणि शोषित वंचितांच्या जगण्याला त्यांनी आपल्या काव्यगीतांच्या माध्यमातून स्पर्श केलेला आहे. यावर असे म्हणता येईल की, "वामनदादांनी पहिली गजल लिहिली. ती भीमा कोरेगावच्या युद्धावर नंतर दुसरी गझल सामाजिक बांधिलकी स्विकारून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारी दिसते शेतकऱ्यांचा शिनभाव उतरावा म्हणून त्यांच्या मनोरंजनासाठी गजल लिहिली. धन्यासाठी मळयात भाकरी घेऊन येणारी बायको, प्रितीच्या झोक्यावर बसून प्रियकराचे गाणे गाणारी प्रियशी, गजल

देश धर्म, धम्म, वाईट व्यसन, अंधश्रद्धा, हुंडा बळी अशा सामाजिक विषयावर आपले मौलिक भाष्य करते आणि अवघ्या विश्वातील माणूस सुखी व्हावा, यासाठी माणसाची सुक्त गाते.

माणसा इथे मी तुझे गीत गावे
असे गीत गावे तुझे हित व्हावे
एकाने हसावे लाखोने रडावे
असे विश्व आता इथे न उरावे"(५)

या सारख्या गझलच्या माध्यमातून वामनदादांनी मानवाला केंद्रस्थानी ठेवले आहे. सर्व सामान्य मानसावरच्या हितासाठी शोषितांच्या रडणाऱ्या डोळ्यातील अश्रू पुसणारी आणि मानवी कल्याणाचा उद्धार करणारी ही गझल आहे. या गझलेच्या माध्यमातून सामाजिक भान ठेवून समाज मनावरील दु:ख व्यथा वेदना, आक्रोश मांडण्याचे काम त्यांनी केलेले आहे.

**संदर्भ सुची :**

१) बोराडे बाबा, आंबेडकरी लोकशाहिर : वामन कर्डक, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती - जुलै १९५६५ पृ.क्र. ५८.
२) वाघ गंगाधर आंबेडकरी विचार जनमनात रूजविणारा महाकवी, वामनदादा कर्डक, राहूल प्रकाश, द्वितीयवृत्ती २०११ पृ.क्र. १३१.
३) गायकवाड माधवराव, जाधव डॉ. सागर (संपा), महाकवी वामनदादा कर्डक समग्र वाङ्मय खंड ४ अवलोक संबोधी प्रकाशन, यवतमाळ, पृ. आ. १४ एप्रिल २०१६ पृ.क्र. १७१.
४) त्रतैव, पृ.क्र. ३२२.
५) त्रतैव, पृ.क्र. ७४.

# २५. मानव कल्याणासाठी तथागत गौतम बुध्दाची मानसशास्त्रीय प्रयोगशाळा

**शशिमोहन राजाराम सिरसाट**
संशोधक, पालि विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
**प्रा. डॉ. मनोहर सिरसाट**
मार्गदर्शक, विभागप्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग आणि संशोधन केंद्र बलभीम महाविद्यालय, बीड.
**प्रा. डॉ. बालाजी एम. गव्हाळे**
पालि विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महाविद्यालय राणीसावरगाव ता. गंगाखेड, जी. परभणी.

**सारांश**

मानव कल्याणासाठी तथागत गौतम बुद्धानी उपचारात्मकरित्या मनोविश्लेषणातून समस्या जाणून घेतल्या. त्यांनी चार आर्यसत्यांची संकल्पना मांडली. चार आर्यसत्य म्हणजे विश्वात दुःख, आहे, दुःखाला कारण आहे, दुःख नष्ट करता येते, दुःख नष्ट करण्याचे विविध मार्ग आहेत. मानवाच्या समस्या जाणून घेण्यासाठी तथागतांनी गृहत्याग केला व परिव्रज्जा धारण केली आणि विश्वालाच मानसशास्त्राची प्रयोगशाळा समजून सूक्ष्म निरीक्षणातून मानवाच्या समस्या जाणून घेतल्या. तथागतानंतर विविध सामाजिक सिद्धांत मांडण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने वॉल्टर वालेस यांचे १९६९ चे वर्गीकरण आहे. सामाजिक परिवर्तन आणि संतूलनाकरीता पंचशिल, अष्टांगिक मार्ग, दसपारमिता हे महत्त्वपूर्ण उपाय सामाजिक परिवर्तनासाठी तथागतांनी सांगितले. 'पुग्गल पञ्ञति' या ग्रंथातून व्यक्तिस्वभावाचे वर्णन त्यांनी दहा प्रमुख भागातून केलेले असून ३९० व्यक्तींच्या विविध प्रवृत्ती सांगितलेल्या आहेत. आधुनिक मानसशास्त्रात हिप्पोक्रेटस यांच्या व्यक्तीमत्त्व वर्गीकरणाशिवाय तथागतांनी थेरगाथा, थेरीगाथा, जातककथा, आणि त्रिपिटकांमधून भिक्खू-भिक्खूणी यांच्या वैशिष्ट्यांचे वर्गीकरण इतंभूत केलेले आहे. तेव्हा डॉ. सिग्मंड फ्राईडच्या अगोदर मनोविश्लेषणाचे आद्य पुरस्कर्ते तथागत गौतम बुद्धच आहेत. असे मला वाटते.

**बीज शब्द** : रोहीणी नदीच्या पाण्याचा वाद, वॉल्टर वालेसचे वर्गीकरण, सामाजिक सिद्धांत, तथागतांचा अष्टांगिक मार्ग व पंचशिल, हिप्पोक्रेटस, डॉ. सिग्मंड फ्राईड, डॉ. अल्बर्ट एलिस. सिद्धांत

**प्रस्तावना**

सिद्धार्थ गौतम बुद्धांनी गृहत्याग केला तेव्हा सामाजिक परिस्थिती चांगली नव्हती. त्यावेळी अनागोंदी अत्याचार आणि सामाजिक विषमता होती. रोहिणी नदीचे पाणी शाक्याने घ्यायचे की कोलियांनी हा सुद्धा एक वाद मोठा होता. अशा परिस्थीवर सिद्धार्थ गौतमाने चिंतन केले. आपणच या साठी उपाययोजना करायला पाहिजे असे मत त्यांचे झाले. त्यांनी तपश्चर्येतून दिव्यज्ञान मिळविल्यानंतर त्यांनी पहिले धम्मचक्र प्रवर्तन पंचवर्गीय भिक्खू संघास सारनाथ येथे दिले. भिक्खूंना त्यांनी शीलमार्ग आणि विशुद्धीमार्गाचे तत्त्वज्ञान आणि सिद्धांत सांगितले. मानवाच्या कल्याणासाठी तथागत गौतम बुद्धांनी पंचशील,

प्रकार्यात्मक-संरचनात्मकवाद, विनियम संरचनात्मकवाद, संघर्ष संरचनात्मकवाद, जनांकिकीवाद, प्रतिकात्मक आंतरक्रियावाद, सामाजिक क्रियावाद, प्रकार्यात्मक अनिर्वावाद, प्रौद्योकिवाद अशा प्रकारचे वर्गीकरण केलेले असून "त्यांनी संघर्ष संचरनात्मकवाद यामधील संकल्पना मांडताना म्हटले. सामाजिक जीवनात भाग घेणाऱ्या दोन किंवा अधिक घटकामध्ये विनिमय होत असल्यामुळे संरचना निर्माण होत नाही तर विघटन देखील घडून येण्याची शक्यता असते. अशा प्रकारे समाजशास्त्रीय चिंतन करताना सामाजिक संघर्ष निर्माण होऊन विघटन होते."

सिद्धार्थ गौतम बुद्ध संघाचे सभासद होऊन आठ वर्ष झाली होती. त्यांच्या जीवनातील एक प्रसंग आहे. "शाक्याच्या राज्याच्या सीमेला लागून कोलियांचे राज्य होते. रोहीणी नदीमुळे ही दोन्ही राज्य विभागली होती. रोहीणी नदीचे पाणी शाक्य व कोलीय हे दोघेही आपआपल्या शेतीकरीता वापरत होते. रोहीणी नदीचे पाणी प्रथम कोणी व किती घ्यावे याबद्दल प्रत्येक सुगीच्या हंगामात त्यांचा वाद नेहमी होत असे. या वादाची परिणिती भांडतात व काही प्रसंगी मारामारीत होत असे." अशा प्रसंगी सिद्धार्थ गौतमांनी जो गृहत्याग करून परिव्रज्जा स्विकारली ती केवळ समाजशास्त्रीय असंतुलन निर्माण झाल्याने तेव्हा सामाजिक संतुलन केवळ मनोविश्लेषणातूनच होऊ शकते. यासाठी विश्वाच्या कुटुंबात काय समस्या आहेत. याविषयी माहिती अनुभवाद्वारे सिद्धार्थ गौतमास घेणे गरजेचे होते. त्यांनी विविध घटना प्रसंग वितंडवाद, द्वेष, मत्सर, लोभ व्यसनाधिनता यावर उपाय जर शोधावचे असतील तर सर्वप्रथम आत्मविश्लेषण गरजेचे आहे. स्वअनुभूतीद्वारे ज्ञान संपादन करूनच आपणास उपाययोजना करता येतील. अशा प्रकारचा मानवल्याणासाठी अनुकूल विचार त्यांच्या मनात आला आणि त्यांनी मिळविलेल्या ज्ञानातून सतत ४५ वर्षे समाजाचे कल्याण होईल अशाप्रकारे उपचारात्मक उपदेशास सुरुवात केली. दिव्यज्ञान प्राप्त करून पुढे त्यांनी पंचवर्गीय भिक्खूंना सारनाथ येथे पहिले प्रवचन दिले. त्यांना शिलमार्ग आणि विशुद्धी मार्गाविषयी सांगताना अष्टांगिक मार्गाचा उपयोग निश्चितच सामाजिक संतुलन राखण्यासाठी होऊ शकतो. असा विचार त्यांनी मांडला आणि अष्टांगिक मार्ग म्हणजे सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मात, सम्यक आजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती, सम्यक समाधी या आठ महत्त्वाच्या तत्त्वानुसार समाजातील ज्या ज्या अप्रिय अकुशल घटना घडतात त्याचे निराकरण या अष्टांगिक मार्गाद्वारे निश्चितच होऊ शकेल असा विश्वास त्यांना वाटला. आज या मार्गाने जो समाज, समाजातील वर्ग तत्त्वाचा अवलंब करतील त्यांना त्यांच्या जीवनात निश्चितच समस्यामुक्त, व्याधीमुक्त होती येईल. आणि मानवाचे व समाजाचे मानसीक आरोग्य व सामाजिक आरोग्य चांगले राहील. याशिवाय तथागत गौतम बुद्धांनी सूक्ष्मनिरीक्षणातून मनुष्याचे स्वभाव विशेषाचे देखील निरीक्षण केले आणि अभिधम्मपिटकातील चौथ्या क्रमांकाचा ग्रंथ 'पुग्गल पञ्ञति' यामध्ये मनुष्य स्वभावाचे प्रमुख दहा विभाग करून जवळपास ३९० स्वभावाच्या विविध प्रवृत्ति सांगितल्या ज्या प्रवृत्ति समाजाला अनुकूल असतात. त्यामधून सामाजिक विकास होत असतो. सामाजिक स्थिरता निर्माण होत असते. जाती-जाती, समाज, धर्म, यामध्ये सलोखा निर्माण होत असतो. आणि ज्या प्रवृत्ति समाजाला विघटनाच्या व संघर्षाच्या दिशेने घेऊन जाण्यास कारणीभूत ठरतात अशा देखील व्यक्ती स्वभावाच्या प्रवृत्तिविषयी त्यांनी, बौद्ध ग्रंथामधून विचार मांडलेले आहेत. पुग्गल पञ्ञति या ग्रंथात चार प्रकारच्या मनुष्य स्वभावाविषयी विवचेन करताना सांगितले आहे. काही व्यक्ती अंधाराकडून अंधाराकडे जाणारे काही अंधाराकडून प्रकाशाकडे

तथागत गौतम बुद्धांनी केला. त्याचप्रमाणे डॉ. अल्बर्ट एलिस यांनी विवेकनिष्ठ मानसोपचार शास्त्राची संकल्पना मांडली. एलिस यांनी दुःखवादाविषयी तत्त्वज्ञान मांडले, परंतु तथागत गौतम बुद्धांनी केवळ दुःखवाद सांगितला नसून त्यासोबतच चार आर्यसत्याची संकल्पना मांडलेली असून दुःख निरोधाचे विविध मार्ग सांगितलेले आहेत. अशाप्रकारे मानवकल्यासाठी तथागतांची मानसशास्त्रीय प्रयोगशाळा म्हणजे त्रिपिटक होय.

**संदर्भ सूची**

१) डॉ. एस. आर., तोष्णीवाल उच्च स्तर समाजशास्त्रीय सिद्धांत पिंपळापूरे अॅन्ड पब्लिशर्स नागपूर, जुलै २००१, पृ. २५,२६,२७, २१४

२) डॉ. भिमराव रामजी आंबेडकर अनु. घनश्याम तळवटकर, प्राचार्य म. भि. चिटणीस, शां. शं. रेगे, भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००७, पृ. २४

३) प्रा. डॉ. भदन्त एम. सत्यपाल, अभिधम्मपिटक पुग्गल पञ्ञति, प्रथम आवृत्ती, २००६, पृ. २८

४) प्रा. र. वि. पंडीत, डॉ. अ. वि. कुलकर्णी, डॉ. च. वि. गोरे, सामान्य मानसशास्त्र, पिंपळापुरे अॅन्ड पब्लिशर्स नागपूर, द्वितीय आवृत्ती, जानेवारी २००४, पृ. २८०

५) कि. मो. फडके, अंजली जोशी, अल्बर्ट एलिस, विचार दर्शन, शब्द प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, नोव्हेंबर २०१८, पृ.३८

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 199 :
Roll of ICT in Higher Education
ISSN : 2348-7143
October-2019

# साहित्य आणि सामाजिकशास्त्रे संशोधन : एक अनुबंध

प्रा. डॉ. मनोहर सिरसाट
संशोधन मार्गदर्शक, मराठी
विभागप्रमुख बलभीम महाविद्यालय,
जि.बीड

रेणुका शिवलिंगआप्पा संभाहरे
संशोधक विद्यार्थीनी

**प्रस्तावना :**

'संशोधन' या शब्दाचा अर्थ शोधणे असा होतो. साहित्याचे संशोधन करत असताना ते सर्व बाजूने परिपूर्ण असे असावे लागते. संशोधनाचा मुख्यगाभा लक्षात घेऊन ते संशोधन होणे गरजेचे आहे. साहित्याचे संशोधन हे फक्त वाङ्मयीन बाजुने न करता ते सर्व बाजूने करावे लागते. उदा. एखाद्या साहित्यकृतीचा इतिहास, त्यातील सामाजिक जाणीव, आर्थिक, राजकीय, धार्मिक परिस्थिती ही तेवढीच महत्वाची असते.

संशोधन करणे म्हणजे फक्त शोधणे नाही तर, प्रत्येक गोष्टीची चिकित्सक पाहणी तेथे अपेक्षित असते. संशोधनात प्रत्येक घटकाचा त्यांच्या उपघटकाचा अभ्यास करावा लागतो. प्रत्येक घटक, उपघटक वेगवेगळ्या दृष्टीकोनातून पडताळून पहाव्या लागतात. एखादी साहित्यकृती तिची वेगवेगळ्या निकषाच्या आधारे शहानीशा साहित्याच्या संशोधनात करावी लागते. अंतरविद्याशाखीय संशोधनात एका घटकाचा दुसऱ्या घटकांशी संबंध येतो. उदा. मानवाचा इतिहास सांगताना त्याचे भौगोलिक वातावरण, त्याचा समाज, त्याची भाषा त्याच्या बाजूची सर्वांगीण परिस्थिती यांचा अभ्यास अंतरविद्याशाखेच्या संशोधनात करावा लागतो.

साहित्य आणि इतर विषयांचा परस्पर संबंध असतो. हा संबंध जोडल्याशिवाय अर्थात साहित्याचा इतर शास्त्राशी संपर्क आल्याशिवाय साहित्याचे संशोधन होत नाही. या अनुषंगाने अंतरविद्याशाखीय संशोधन हे फार महत्वपूर्ण ठरते.

**संशोधन संकल्पना :**

"संशोधन ही एक बौध्दीक प्रक्रिया आहे. संशोधनामध्ये नवीन ज्ञानाचे संपादन केले जाते आणि जुन्या ज्ञानाचे परीक्षण केले जाते. इंग्रजीमध्ये संशोधनाला 'Research' असे म्हणतात. Research म्हणजे पुन्हा - पुन्हा शोधणे होय."[१] संशोधन म्हणजे आपल्याला माहित असलेल्या माहितीच्या आधारे माहित नसलेल्या माहितीचा शोध घेणे. संशोधनाने आपल्या आजूबाजूची सर्वच क्षेत्रे व्यापलेली आहे. तेवढेच नव्हे तर हे जीवनातील सर्वच क्षेत्रांचा आधार बनले आहे. आज असे एकही क्षेत्र नाही जिथे संशोधन नाही. त्यामुळे प्रत्येकाच्या अंगी संशोधकाचा गुण असायला हवा. "संशोधन म्हणजे केवळ एखाद्या गोष्टीचा शोध घेणे म्हणजे संशोधन नव्हे तो संशोधनाचा पहिला घटक ठरतो. म्हणजे संशोधन नव्हे तो संशोधनाचा पहिला घटक ठरतो. परंतू त्या घटकाचे संश्लेषण विश्लेषण करणे त्यावर पुन्हा-पुन्हा विचार करणे. कोणत्या तरी मूलभूत अशा नव्या सिध्दांतापर्यंत पोहचणे होय."[२]

**संशोधनाची पार्श्वभूमी :**

'संशोधन' ही बुध्दीनिष्ठ चालणारी प्रक्रिया असून, या प्रक्रियेच्या माध्यमातून नवीन ज्ञान घेतले जाते. संशोधनामध्ये ज्ञानाचे तसेच प्रत्येक गोष्टीचे परीक्षण व निरीक्षण केले जाते. आणि त्याचबरोबर संशोधनाचा ढोबळ मानाने असा अर्थ लावला जातो. पुन्हा:पुन्हा शोध घेणे होय. संशोधन हे ज्ञान असलेल्या गोष्टींच्या आधारे अज्ञात गोष्टींचा शोध घेणे. संशोधन हे प्रत्येक क्षेत्र फार व्यापक पध्दतीने विचार केला जातो. आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात संशोधनाला फार महत्व आहे आणि असे कुठलेही क्षेत्र नाही. ज्यात संशोधनाने प्रवेश केला नाही. 'संशोधन' म्हणजे नवीन विचार शोधून काढणे होय. संशोधनाची व्याप्ती म्हणजे अभ्यासासाठी कोणते क्षेत्र निवडलेल्या क्षेत्रातील घटक उपघटक कोणत्या पध्दतीने निवडले त्या घटकांबाबत किंवा त्या विषयाबाबत किती व कोणत्या प्रकारची माहिती जमा केलेली



il.google.com/mail/u/0/#inbox/FMfcgxwKkHlrjzSKVqCZxHJWDZkIwTMV?projector=1&messagePartId=0.1 1/

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 199 : Roll of ICT in Higher Education
ISSN : 2348-7143
October-2019

आहे. स्पष्ट शब्दांत त्याची मांडणी करणे गरजेचे किंवा महत्वाचे असते आणि त्यांचबरोबर संशोधनात संशोधकाने काढलेले निष्कर्ष व्यापक स्वरुपाचे आहे हे संशोधकाच्या मांडणीतील प्रामणिकपणातून प्रतिबिंबित होत असते.

संशोधन हे समस्याचे मुळ शोधण्याचे एक व्यासपीठ आहे. संशोधनामुळे संशोधकाच्या ज्ञान कक्षा वाढल्या जातात. यातून विचारक्षमता, निर्णय घेण्याची शक्ती. तसेच त्याबरोबर तार्किक बुध्दीमत्ता होते. त्याबरोबरीने व्यक्तीमत्वाचा विकास होत जातो. ज्ञानाची पातळी ही सखोल होत जाते. संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. कोणतेही ज्ञान हे त्रिकालाबाधीत सत्य नसते किंवा कोणताही सिध्दांत हा अंतिम सत्य नसतो. त्यामध्ये सतत परीश्रम नवीन निष्कर्षाची भर घातली जाते आणि जूने निष्कर्ष तपासून पाहणे हे प्रयत्न सतत चालू असतात.

**आंतरविद्याशाखीय संशोधन :**

'संशोधन' हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. हे म्हणणे वावगे ठरणार नाही. संशोधन हे बारकाईने करत गेल्यास त्याचा अभ्यास करत गेल्यास त्याची ज्ञानकक्षा अधिकाधिक वाढत गेली. नैसर्गिक घटनेतून त्यांच्या कारणातून नैसर्गिक विज्ञानांची उत्पत्ती झाली. त्यामुळे माणसाला निसर्ग संबंधित अनेक माहित नसलेल्या गोष्टी माहिती करुन घेऊन आपल्या जीवनाच्या विकासासाठी त्याचा वापर सुरु केला. विज्ञान व विज्ञानातून आलेले तंत्रज्ञान यांच्या आधारे मानवाने भौतिकदृष्ट्या विकासाची एकता अनेक टप्पे पार केलेले दिसून येते. आणि त्याचबरोबर या प्रवाहात अनेक शाखा उपशाखा निर्माण झाल्या. माणूस हा समूहात किंवा समाजात राहत असणारा व्यक्ती आहे. म्हणजे भाषा बोलणारा असल्यामुळे त्याचे स्वत:चे जीवन सहजरित्या निर्माण केले आणि समाज निर्माण केलेला दिसून येतो आणि यात स्वाभाविकपणे समाजव्यवस्थेत बदल होत गेला. अशा मार्गातून त्याचा एक नवीन इतिहासाच्या अभ्यासाची आवश्यकता निर्माण झाली. या आवश्यकतेमधूनच मग अनेक सामाजिकशास्त्रे निर्माण झाली. ही सामाजिकशास्त्रे माणसांच्या वागणुकीचा व माणसांच्या संघवर्तनाचा अभ्यास करत त्या संदर्भातील ज्ञानसंचय करताना दिसून येतात.

"सामाजिकशास्त्रातल्या सिध्दांतातून हाती आलेले मानवी वर्तनविषयक आकलन तर साहित्यात चित्रीत झालेल्या जीवनाशयाच्या आकलनाला निश्चितच पूरक ठरणार आहे."[3] साहित्य आणि समाज यांचा संबंध अतिशय जवळचा माहित आहे. कलाकारांचा कितीही कलेसाठी कला असा विचार असला तरी साहित्याचा जीवनवादाशी असलेला संबंध अमान्य करता येत नाही. ही सत्य परिस्थिती आहे. समाजशास्त्राने समाज वास्तवाविषयी सामाजिक वृत्ती प्रवृत्तीविषयी, आवडी-निवडीविषयी समाजाच्या वाटचाली विषयी, दिशाविषयी, समाजातील धार्मिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीविषयी निष्कर्ष नोंदी केलेल्या असतात. सामाजिक रुढी, परंपरा, प्रथा यांच्या मूळ स्थानांचा शोध घेतलेला असतो. समाजात दूर गेलेल्या विविध जातीचे, जमातीचे अल्पसंख्यांकाचे वर्णभ्यास उपलब्ध करुन दिलेले असतात. या जाती जमातीच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थानाविषयी काही वाक्यरचना केलेली असते. काही आकडेमोड दिलेली असते. त्यांच्या वृत्ती, प्रवृत्ती भिन्न-भिन्न असतात. याचे देखील मूल्यमापन अंतरविद्याशाखीय संशोधनात येत असते. आणि असे मूल्यमापन समाज परिवर्तन विषयीचे सिध्दांत समाजाची कालखंडनिहाय वाटचाल झालेली बदलांची कारणे साहित्याच्या संशोधकाला माहिती असायला पाहिजे. या ज्ञानाच्या साहाय्याने साहित्याचे सामाजिक आधारस्तंभ निश्चित करायचे सामाजिक निरिक्षणे आणि साहित्यातील आत्मनिरीक्षणे समाजनिरीक्षणे यांचा तुलनात्मक अभ्यास साहित्यांचे सामाजिक योगदान स्पष्ट करु शकतो. साहित्याची चिकित्सा करत असताना विज्ञान आणि समाजशास्त्रामधून हाती आलेल्या काही निष्कर्षाचा नक्कीच फायदा होऊ शकतो. साहित्यात आलेले वर्णन वास्तव साहित्याने आधी खोडून टाकले असते. आणि मग ते विज्ञानाशी सुसंगत की विसंगत असे प्रश्न निर्माण होऊ शकतात. अशा प्रकारच्या अभ्यासावरुन किंवा पडताळणीवरुन साहित्यातील सत्यचित्रणावर अधिक नेमक्यापणे बोलून त्याची निष्कर्ष नोंद करता येऊ शकते.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 199 :
Roll of ICT in Higher Education
ISSN : 2348-7143
October-2019

नवविज्ञानाच्या उजेडात नवआकलन उपलब्ध करुन दिल्यानंतर साहित्य हे नवज्ञानाला मिसळून जाते आहे. याची पडताळणी साहित्य संशोधनात महत्वाची ठरते. संशोधकाने हे लक्षात घेणे महत्वाचे असते. वैज्ञानिक सत्यांना प्राधान्य देत काही साहित्य लिहिलेले असते, त्याला आपण 'विज्ञानसाहित्य' असे म्हणतो. या साहित्याचे संशोधन करतांना संशोधकाला साहित्य ज्या प्रकारच्या विज्ञानशाखेवर आधारलेले आहे. त्या शाखेचा थोडाफार अभ्यास असायला हवा नसेल तर तो करुन घ्यायला हवा. असे साहित्य समजून व मूल्यमापन पूर्णपणे मांडता येऊ शकत नाही. साहित्यात बऱ्याच वेळा वैज्ञानिक दृष्टीविरोधी अशा श्रध्दा-अंधश्रध्दांचे चित्र उभे असलेले दिसते. धर्म-पंथ-जात या सत्येबाबतीत समाजातील निरर्थक परंपरावादी मानसिकता व्यक्त झालेली दिसून येते. अशावेळी संशोधक अभ्यासकाने विज्ञानदृष्टी घेऊन सत्य पडताळून अशा साहित्याला तोंड द्यावे लागते. तटस्थपणे भूमिका घेऊन साहित्यनिरीक्षणे नोंदवावी लागतात.

विज्ञान-तंत्रज्ञान याने आलेले बदल संशोधक अभ्यासकाला माहित असायला पाहिजे. त्याचबरोबर संशोधकाला संगणकातील ज्ञान व कौशल्य माहिती असणे गरजेचे आहे. यामूळे संशोधन कार्यात अनेक प्रकारची मदत होऊ शकते. संगणकामुळे आपण वेगवेगळी माहिती जमा करु शकतो आणि संग्रहीत करु शकतो. संदर्भ सुची निर्मिती ते टंकलेखनापर्यंत अशा अनेक प्रकारे मदत संगणकातून होते. साहित्य आणि विज्ञान ह्या परस्पर विरोधी बाबी नसून त्या परस्पर पूरक बाबी आहेत हे लक्षात घ्यायला पाहिजे. संशोधकाने ते साहित्य वगळून न टाकता त्याने जमेल तेवढे ते आत्मसात करत त्याचे साहित्य संशोधनात उपयोजन करायला हवे.

**निष्कर्ष :**

१. साहित्याचा आणि इतर शाखेतील संशोधनाचा जवळचा संबंध आहे.
२. आंतरविद्याशाखेशी साहित्याचा संबंध आल्याशिवाय साहित्याचे संशोधन होत नाही.
३. आंतरविद्याशाखीय संशोधन करत असताना साहित्य हे मध्यवर्ती असते.
४. साहित्याचा संशोधनात आंतरविद्याशाखीय विषयाचा आधार घ्यावाच लागतो.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ.पाटील रंजना बाळासाहेब, 'संशोधन पध्दती' टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, आवृत्ती २०१६ पृ.२
२. आवलगावकर अविनाश, 'मराठी साहित्य संशोधन : नव्या दिशा,' प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती २००६, प्रस्तावना पृ.९
३. डॉ.शेलार सुधाकर, 'साहित्य संशोधन वाटा आणि वळणे.,' बाळासाहेब घोंगडे अक्षरवाङ्मय प्रकाशन, धायरी,' बेनकरनगर, पुणे प्रथमावृत्ती १३ जून २०१९ पृ.९१.